# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

4 था मजला, एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट, मुंबई–21.
दूरध्वनी क्र.(022)2025354, 2026249,
2835247.
फॅक्स : (91) 022–202 9348

क्र.मजीप्रा/1097/सभा–73/आ–4/

दिनांक : 22 एप्रिल, 1997.

विषय : शनिवार दि. 12.4.1997 रोजी संपन्न झालेल्या प्राधिकरणाच्या 73 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 73 वी सभा शनिवार दिनांक 12.4.1997 रोजी दुपारी 4.00 वाजता प्राधिकरणाचे अध्यक्ष व मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त सोबत मंजूरीस्तव सादर करीत आहे.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव.

प्राधिकरणाचे सदस्य व प्रधान सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई–32.

प्राधिकरणाचे मा.उपाध्यक्ष तथा मा.राज्यमंत्री,
नगर विकास तथा पा.पु. व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई.

प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष तथा मा.मंत्री,
पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई.

letter72/

पुढील बैठक २८ जून रोजी ... 

मा. मंत्रीमहोदयांशी याबाबत बोलणे झाले. २८/६ त्यांनाहि व मलाहि सोईस्कर नाही म्हणून पुढील तारीख ... श्री हाकेंना लिहावे
30/5/97.

उपरोक्त आदेशानुसार मसुदा सोबत मंजूरीकरीता सादर
3/5

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

दिनांक 12.4.1997 (शनिवार) रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 73 व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 73 वी सभा शनिवार दिनांक 12.4.1997 रोजी दुपारी 4.00 वाजता मंडळाचे अध्यक्ष तथा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. **मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,**
   अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तथा
   मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई.
2. **मा.श्री.रविंद्र गाने,**
   उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तथा
   राज्यमंत्री, नगर विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता,मंत्रालय, मुंबई.
3. **श्री.वेंकट चारी,**
   सदस्य,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तथा
   अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
4. **श्री.राजेंद्र सगणे,**
   सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

प्राधिकरणाच्या सभेस उपस्थित राहून शकलेल्या सदस्यांच्या रजेस मंजूरी देण्यांत आली.

खालील अधिकारी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

1. **श्री. अे.के.मागो,**
   प्रधान सचिव (वन), मंत्रालय, मुंबई.
2. **श्री.अशोक सिन्हा,**
   आयुक्त,कोंकण विभाग,
3. **श्री.रेड्डी,**
   अतिरिक्त आयुक्त कोंकण विभाग
4. **श्री.शे.दां.अरगाळ,**
   मुख्य अभियंता, (कोंकण विभाग), ठाणे.
5. **श्री.नि.कृ.गाडा,**
   मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई–21.
6. **श्री.भा.आ.डोंगरे,**
   वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई.

प्राधिकरणाचे सदस्य सचिव श्री.राजेंद्र सगणे यांनी प्रथम अध्यक्ष, उपाध्यक्ष व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले व सभेच्या पुढील कामकाजास सुरुवात केली.

**कार्यक्रम बाब क्र.1 :– 71 व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

मंडळाने प्रसृत केलेल्या इतिवृत्तावर कोणत्याही सदस्यांची सूचना वा आक्षेप आले नसल्याने इतिवृत्तास मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.2 :– 71 व्या सभेतील कार्यक्रम बाबींवर करण्यांत आलेली कृती.**

71 व्या सभेतील मंजूर करण्यांत आलेल्या कार्यक्रम बाबींवर केलेली कृती सदस्य सचिवांनी बाबवार सभेपूढे वाचून दाखविली व सर्वानूमते केलेल्या कृतीस मान्यता देण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.3 :– 72 व्या सभेतील इतिवृत्तास मान्यता देणे.**

72 व्या सभेतील इतिवृत्त प्रशासकीय कारणास्तव 73 व्या सभेत मान्यतेसाठी ठेवण्यांत आले नसल्याचे सदस्य सचिवांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले व सदर इतिवृत्त प्राधिकरणाच्या 74 व्या सभेपूढे मान्यतेसाठी ठेवण्याचे सूचित केले यास सर्व सदस्यांनी मान्यता दर्शविली.

**कार्यक्रम बाब क्र.4 :– 72 व्या सभेतील कार्यक्रम बाबींवर करण्यांत आलेली कृती.**

72 व्या सभेतील कार्यक्रम बाबींवर प्रशासकीय कारणास्तव कृती करण्यांत आलेली नाही. परंतु लवकरच 72 व्या सभेतील मंजूर बाबींवर कृती करण्यांत येवून, केलेली कृती प्राधिकरणाच्या 74 व्या सभेपूढे ठेवून सभेची मान्यता घेण्याचे सदस्य सचिवांनी सूचित केले. यावर सर्व सदस्यांनी मान्यता दर्शविली.

**गोपनीय कार्यक्रम बाब क्र.5 :– मोर्बे धरणाच्या बुडित क्षेत्रात येणा–या गावांच्या पुनर्वसनाबाबत द्यावयाची नुकसान भरपाई.**

प्रस्तावित गोपनीय कार्यक्रम बाबींवर चर्चा करण्याच्या आधी मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, ठाणे यांनी प्राधिकरणाच्या उपस्थित सभासदांस तसेच खास निमंत्रित अधिका–यांस प्रकल्पाचे काम का बंद पडले आहे त्याचे प्रास्ताविक कथन केले.

मोर्बे धरणाच्या बुडीत क्षेत्रात एकूण 6 गावे येत असून या 6 गावातील एकूण 287 घरांची नुकसान भरपाई द्यावी लागणार आहे. या 287 घरांपैकी 246 घरांची नोंद या संदर्भातील भूसंपादन कायद्यातील सेक्शन–4 ची नोटीस जारी करण्यापूर्वी ही घरे अस्तित्वात असूनही त्यांची नोंद संबंधीत ग्रामपंचायतीच्या दप्तरी करण्यांत आलेली नव्हती. या 246 घरांची नोंद आता ग्रामपंचायतींच्या दप्तरी करण्यांत आलेली आहे. तथापी उर्वरीत 41 घरे मात्र ग्रामपंचायतीच्या दप्तरी नोंद न केलेली अशीच आहेत, कारण त्यांची बांधणी ही सेक्शन–4 ची नोटीस जारी करण्याच्या तारखेनंतर झालेली आहे.

वरील घरांचा मोबदला संबंधीत प्रकल्प ग्रस्तांना दिलेला नसल्याने त्यांनी या धरणाचे काम दिनांक 10 मार्च, 97 रोजी बंद पाडले आहे. या धरणाचे काम बंद पडल्यामुळे :–

1. दररोज सुमारे 15 लाख रुपये किंमतीचे धरणाचे काम होऊ शकत नाही. त्यामुळे जितके दिवस काम बंद राहील तितक्या प्रमाणात धरणाची किंमत वाढेल.
2. ठेकेदाराने धरणाचे कामासाठी आणलेली यंत्रसामुग्री काम बंद झालेले असल्यामुळे दि. 10 मार्च, 97 पासून वापरात नाही. त्यामुळे त्यापोटी ठेकेदाराने रोज रु.10 लाख नुकसान भरपाई पोटी मिळावेत अशी मागणी केली आहे. अगदी सुरुवातीच्या काळात देखील प्रकल्पग्रस्तांनी धरणाचे काम चालू करुन दिले नव्हते त्या काळात देखील ठेकेदाराने कामावर आणलेल्या यंत्रसामुग्रीच्या नुकसान भरपाईपोटी अशाच प्रकारची नुकसान भरपाई ठेकेदारास द्यावी लागलेली आहे. अर्थात त्यावेळी धरणाच्या कामावर आणलेली यंत्रसामुग्री खूपच कमी होती. त्यामुळे नुकसान भरपाईची दररोजची रक्कम खूपच कमी होती.

3. सध्या धरणाचे काम अशा स्थितीत आहे की, हे काम सुरक्षित पातळीपर्यंत आणले जाणे अत्यावश्यक आहे. ते तसे आणता आले नाहीतर धरणाच्या सुरक्षिततेस धोका संभवतो. धरणाचे काम सुरक्षित पातळीपर्यंत आणण्यासाठी किमान 40 दिवसांचा कालावधी लागेल.

4. ऑक्टोबर 1999 पासून या धरणातून उपलब्ध होणारे सुमारे 150 द.ल.लिटर्स पाणी दररोज सिडको प्रशासनास पुरविणे अपेक्षित आहे. त्यामुळे धरणाचे काम जितके दिवस बंद राहील तितका काळ सध्याच्या पाण्याच्या प्रचलित दरानुसार दरवर्षी सुमारे 11 कोटी रुपये महसुलास प्राधिकरणास मुकावे लागेल. याशिवाय ऑक्टोबर, 1999 नंतर नवी मुंबई भागात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्षयही भासेल.

5. या धरणावर आतापर्यंत सुमारे 100 कोटी रुपये खर्च झालेला आहे. जितके दिवस काम बंद राहील तितके दिवस अप्रत्यक्षपणे वरील रक्कमेच्या व्याजाचे नुकसान होईल.

--- या परिणामास प्राधिकरणास सामोरे जावे लागत असल्याचे मुख्य अभियंता, कोंकण प्रदेश यांनी विषद केले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, वरील अडचणींतून मार्ग काढण्यासाठी मा. राज्यमंत्री.(पाणी पुरवठा व स्वच्छता व नगर विकास) यांनी दि. 30 मार्च, 97 रोजी स्थानिक आमदार, प्राधिकरणाचे अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी आणि प्रकल्पग्रस्तांचे सोबत धरणाचे कामास भेट देवून वर उल्लेख केलेल्या बाबी या वस्तुस्थितीस धरुन असल्याची खात्री करुन घेतली आहे.

सदर भेटीच्या वेळी, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी, महसूल विभागाने सादर केलेल्या सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव प्रचलित नियमांच्या कक्षेबाहेर असल्याने तो प्रस्ताव मंजूर होण्यास फार जास्त वेळ लागण्याची शक्यता मा.राज्यमंत्री यांना सूचित केली. त्यावर मा.राज्यमंत्री यांनी " **या प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता देवून प्रकल्पग्रस्तांच्या अनुदानाचे वाटप केले तर धरणाचे काम लगेच चालू करता येवू शकेल** " असे सूचित केले व प्राधिकरणाची तांतडीची सभा बोलाविण्यांत यावी असे आदेश दिले.

मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) तसेच मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता व नगर विकास) यांनी धरणाचे काम तात्काळ चालू होणे हे अत्यावश्यक असल्याचे विषद करुन उपस्थित महसूल विभागातील अधिकाऱ्यांना अशी विनंती केली की, प्राधिकरणाने रुपये 1,36,10,274/- रकमेच्या सानुग्रह अनुदानाचा ठराव मंजूर करावा. त्यावर सचिव, वित्त, यांनी असे सुचविले की, प्रस्तुत प्रकरणी ज्या 41 अनधिकृत घरांच्याबाबत सानुग्रह अनुदान देणे प्रस्तावित आहे त्यास प्राधिकरणाने मान्यता दिली "**तर अनधिकृत बांधकामांना देखील नुकसान भरपाई/सानुग्रह अनुदान मिळू शकते**" अशी भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये होवून अशाप्रकारचे इतरही काही प्रस्ताव पुढे येण्याची शक्यता विचारात घेवून ही बाब मंत्रीमंडळासमोर सादर करावी व त्यास मंजुरी घ्यावी असे सुचविले.

राज्य मंत्रीमंडळाची सभा केव्हा होईल (पुढील 8-10 दिवसात जोडून सुट्ट्या असल्यामुळे) याची निश्चिती नसल्यामुळे प्राधिकरणाने ठरावास मंत्रीमंडळाची कार्योत्तर मंजुरी घेण्यात येण्याच्या आधीन राहून मंजुरी द्यावी असे ठरले आणि त्यानुसार ठराव पारीत करण्यांत आला.

यावर मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांनी असे सुचविले की, वरीलप्रमाणे ठराव पारीत केल्याचे मा.मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊन, त्यांचे परवानगीने प्राधिकरणास धरणाचे काम त्वरित सुरु करता आले तर होणारा कालापव्यय टाळता येणे शक्य आहे असे सुचविले.

वरील सूचनेनुसार मोर्बे प्रकल्पाचे काम पुन्हा चालू करण्यांत येणा--या अडचणी, त्यामुळे कामावर होत असलेले परिणाम या सार्वांची माहिती देणारी एक टिप्पणी मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचेतर्फे त्याच दिवशी मा. मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यांत आली.

morbe-5/